**बिल अदायगीकामी लेखा विभागाकडे सादर केलेल्या बिलांबाबत-**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- 411018
लेखा विभाग
जा.क्र.लेखा/06/कावि/ 32 /2020
दिनांक : 02/03/2020

परिपत्रक,

लेखा विभागाकडे मनपाच्या सर्व विभागांकडून बिले अदा करणेकामी सादर केली जातात. लेखा विभागाकडून बिले अदायगीची प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर त्या बिलाची स्थळप्रत मूळनस्तीसह संबंधीत विभागांकडे परत पाठविणेत येते. मूळनस्तीसह सदर स्थळप्रतीची जतन करणेची जबाबदारी ही मूळ विभागाची असून विभागाच्या लेखापरीक्षणासाठी मूळनस्ती व प्रमाणकांचे स्थळप्रत उपलब्ध करुन देणे ही विभागाची जबाबदारी आहे. तथापि असे निदर्शनास आले आहे की, बरेच विभाग त्यांचेकडे उपलब्ध न होणा-या प्रमाणकांची मागणी लेखा विभागाकडे वारंवार करीत आहेत.

तरी सर्व विभागांना याद्वारे कळविणेत येते की, प्रत्येक विभागाने आपले रेकॉर्ड (व्हाऊचर्स) व्यवस्थीत जबाबदारीने जतन करुन ठेवावेत आणि आपल्या स्तरावर विभागाच्या लेखापरीक्षणासाठी अभिलेख / प्रमाणक उपलब्ध करुन द्यावेत. विभागाकडील रेकॉर्ड उपलब्ध न होणे ही गंभीर बाब असल्याने संबंधीत कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करुन सदरहू बाब मा.आयुक्तांचे निदर्शनास आणून द्यावी. तदनंतर मा.आयुक्त सो यांची लेखी संमती असल्यास लेखा विभागाकडून व्हाऊचर्स उपलब्ध करुन देणेबाबत तजवीज केली जाईल.

मुख्य लेखा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- 411018

प्रति,
सर्व विभाग